जहांगीर आर्ट गॅलरीतील तळमजल्यावरील दुरूस्ती कामाकरिता येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत....

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्रमांक - प्र.क्र.६७/२०२६/ई ऑफिस-१६४४११२ /सां.का.३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १९ ऑगस्ट, २०२६

वाचा :- संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय यांचे पत्र जा.क्र.संग्रह/सहायक अनुदाने/२०२६/७७२, दि.१४.०८.२०२६

प्रस्तावना :-

सर कावसजी जहांगीर यांनी सन १९५२ मध्ये जहांगीर आर्ट गॅलरीची स्थापना सुपुत्र जहांगीर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ केली आहे. या गॅलरीचा मुख्य उद्देश कला प्रदर्शनांचे आयोजन करणे व कलाविष्कारांना प्रोत्साहन देणे हा आहे. सन १९९० मध्ये जहांगीर आर्ट गॅलरीचे नुतनीकरण विविध देणगीदारांच्या देणगीमधून करण्यात आले असून यास खूप वेळ होऊन गेल्यामुळे सदर गॅलरी आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज करण्याचा आर्ट गॅलरी प्रशासनाचा मानस आहे. सदर गॅलरीच्या तळमजल्याचा पेट्या/सामग्री/कलाकृती साठवण्यासाठी होणारा वापर,जिन्याजवळ होणारी सततची हालचाल यांमुळे तळमजल्याला पोहोचलेली हानी या सर्व दुरूस्ती कामाकरिता येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याची विनंती संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय यांनी उपर्निर्दिष्ट पत्रान्वये केली आहे. त्यानुसार सदर कामास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

जहांगीर आर्ट गॅलरीतील तळमजल्यावरील दुरूस्ती कामाकरिता येणाऱ्या रु.५,००,०००/- (अक्षरी रूपये पाच लाख मात्र) (सर्व करांसहित) इतक्या रकमेस या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

०२. संचालक, पुरातत्व वस्तुसंग्रहालय संचालनालय , मुंबई यांना यासाठी नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास या संबंधिच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

सदर कामाची तांत्रिक तपासणी करुन संग्रहालयशास्त्र संकेतानुसार विकास कामे करण्याची जबाबदारी संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय यांची असेल.

०३. सदर निधी ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आलेला आहे,त्यासाठीच खर्च करण्यात यावा.

०४. सदर काम योग्य दर्जाचे होत आहे, याची खातरजमा संचालक,पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय,मुंबई यांनी करावी.

०५. सदर खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करण्यात यावे.

०६. हा शासन निर्णय विअप्र-२०१३/प्र.क्र.२०/२०१३/विनिमय, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग पहिला उपविभाग तीन मधील अनुक्रमांक ४ मधील परिच्छेद क्र. २७ (२) "अ" नुसार तसेच वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थसंकल्प-३, दिनांक ०९ एप्रिल, २०२६ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकाराच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

०७. यासाठी होणारा खर्च मागणी क्र.झेडडी-२, २२०५ कला व संस्कृती, (०२) (०३) जहांगीर आर्ट गॅलरी (कार्यक्रम), ३१ (२२०५ १८५७) सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता उपलब्ध निधीतून भागविण्यात यावा.

०८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात येत असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२६०८१९१७४९००९४४३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित केलेला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NANDA MARUTI RAUT

Digitally signed by NANDA MARUTI RAUT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Tourism and Cultural Affairs, 2.5.4.20=1983A6357BDEA5C5091136D73EC0B1D7D99AF67DF3CCA676C00FAD04572B4AA9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BAF9D9317025580944685E047B9C52D64C532684054F19E1F02C374B78E1773F, cn=NANDA MARUTI RAUT
Date: 2026.08.19 17:49:56 +05'30'

(नंदा राऊत)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. सचिव (सांस्कृतिक कार्य) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
२. उपसचिव (सां.का.३), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. सचिव, जहांगीर आर्ट गॅलरी (संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय यांच्यामार्फत)
५. महालेखापाल -१ (लेखा व अनुज्ञेयता)/, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. महालेखापाल -२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
८. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. निवड नस्ती, सां.का.३.